‘आदिवासी भूषण पुरस्कार’ निमित्त

# मा. ना. श्री. मधुकरराव पिचड

## गौरव विशेषांक



आदिवासी समाज कृती समिती

महाराष्ट्र, पुणे.

# आदिवासी भूषण पुरस्कार - प्रदान

# व

# मा. ना. श्री. मधुकरराव पिचड गौरव विशेषांक प्रकाशन समारंभ

दिनांक : २५.०८.२००२ वेळ : दुपारी १२.०० वाजता

स्थळ : पिंपरी-चिंचवड प्रेक्षागृह, चिंचवडगाव, पुणे-४११ ०३३

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका

पान क्र.

- आदिवासी विकासाचा द्रष्टा शिल्पकार आदिवासींची अस्मिता : मा. नामदार श्री मधुकरराव पिचड / डॉ. गोविंद गारे .. १
- आदिवासी विकासाचा द्रष्टा शिल्पकारः मा. ना. मधुकरराव पिचड / गंगाराम सांगडे .. ४
- कोळी आणि महादेव कोळी वादाला विधानसभेत मा. ना.श्री मुधकरराव पिचड यांनी आमदार श्री. अनंत तरे यांना दिलेल्या सडेतोड उत्तराचा गोषवारा / संकलन व संपादन : डॉ. गोविंद गारे .. ७
- आदिवासी समाज के केंद्रबिंदू मा. मधुकररावजी पिचड / सौ. कलावती घोरपडे .. १४
- आदिवासी समाजाचा पालनहार : मा. ना. श्री. मधुकरराव पिचड / दामोदर शिंगाडे .. १६
- सामाजिक कार्यकर्त्यांचे आधारवड व्हा ! / कृ. रा. साबळे (गुरुजी) .. १८
- मा. ना. श्री. मधुकरराव पिचड आणि जातिप्रमाणपत्राचा क्रांतिकारक कायदा ! / डॉ. गोविंद गारे .. २०
- महाराष्ट्रातील खऱ्या आदिवासींचे अस्तित्व जोपासणारे माननीय ना. श्री. मधुकरराव पिचड / डॉ. रामकृष्ण पेढेकर (एम.डी.) .. २३
- प्रवरेचा प्रवाही प्रपात ... / डॉ. प्रा. भास्करराव खांडगे .. २५
- अकोले - अगस्त्य आवारातील आदिवासी अस्मितेचा आविष्कार / प्रा. डॉ. अनिल सहस्त्रबुद्धे .. २८
- कर्मयोगी / जी. डी. शिंदे .. ३२
- आदिवासींचा समर्थ नेता / ग. प्र. प्रधान .. ३३
- माझा समन्वयवादी मित्र / डॉ. कुमार सप्तर्षी .. ३५
- कळसूबाईच्या शिखराशी विकासकामांची स्पर्धा करणारा गिर्यारोहक : मा. ना. श्री. मधुकरराव पिचड / माजी खासदार डॉ. वसंतराव पवार .. ३८
- ऑर्डर्ड बाय हायकमांड... / हमीद फारुकी .. ४१
- विकासाची गाथा......! / मीनानाथ पांडे .. ४४
- आदिवासी राजा / श्री. गंगाधर तेंडे .. ४९
- आदिवासी समाजाचं सुजाण नेतृत्व / प्रा. रघुनाथ खरात .. ५१
- शेवटच्या आदिवासीला आरोग्य देणारे ... / डॉ. संजीव कांबळे .. ५४

उप मुख्यमंत्री

सत्यमेव जयते

महाराष्ट्र



श्री. छगन भुजबळ
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : ६ ऑगस्ट २००२

# शुभेच्छा

पुणे येथील आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे यांच्या वतीने प्रदान करण्यात येणाऱ्या 'आदिवासी भूषण पुरस्कार' निमित्त राज्याचे आदिवासी विकास व विशेष सहाय्य मंत्री श्री. मधुकरराव पिचड यांच्यावर गौरव विशेषांक प्रकाशित करण्यात येणार समजून आनंद वाटला.

महाराष्ट्राच्या दुर्गम आणि डोंगराळ भागांतील आदिवासींना विकासाची द्वारे खुली करण्यात श्री. पिचड यांनी फार मोठे योगदान दिले आहे. आधुनिक द्रष्टा पुरुष म्हणून त्यांना ओळखले जाते. राज्यातील आदिवासी जनता आणि राज्य शासन यांच्यातील एक महत्त्वाचा दुवा म्हणून काम करणाऱ्या श्री. पिचड यांना समितीतर्फे आदिवासी भूषण पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम निश्चितच अनुकरणीय आहे. श्री. पिचड यांचे मनःपूर्वक अभिनंदन. त्यांच्या जीवनकार्याचा यथार्थ परिचय गौरव विशेषांकात करून दिला जाईल, असा मला विश्वास वाटतो.

गौरव विशेषांकास माझ्या मनःपूर्वक शुभेच्छा !

(छगन भुजबळ)
उप मुख्यमंत्री,
महाराष्ट्र शासन.

## आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे

# आदिवासी भूषण पुरस्कार

## ।। सन्मानपत्र ।।



### मा. ना. मधुकरराव पिचड

मा. ना. मधुकरराव पिचड,

आपण, जिल्हा अहमदनगर, तालुका अकोले, येथील राजूर या अतिदुर्गम खेडेगावात एका अतिसामान्य आदिवासी प्राथमिक शिक्षकाच्या कुटुंबात जन्मला. आदिवासी समाजाची दैन्यावस्था आपण अनुभवली, न्याहाळली. उच्चशिक्षणाच्या ज्ञानलालसेपोटी आपण फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे, येथे दाखल झाला. ग्रामीण व शहरी जीवनांतील तफावत आपल्या संवेदनाक्षम मनात आदिवासी समाजविकासाच्या विचारांचे काहूर माजवू लागली, त्यामुळे अल्पकाळ स्वीकारलेला नोकरीचा पाश सोडून आपण समाजकार्यासाठी जीवन व्यतीत करण्याचा जो निर्णय घेतला तो क्षण संपूर्ण महाराष्ट्रातीलच नव्हे तर भारतातील आदिवासींना नवी दिशा देऊन गेला.

'आदिवासी उन्नती सेवा मंडळा'च्या आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये, छात्रालये यांचे जाळे, तसेच अकोले एज्युकेशन सोसायटीमार्फत महाविद्यालयीन शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले करून ज्ञानगंगा घरोघरी पोहोचविली. सहकारी दूध उत्पादन

व संकलन संस्था, अमृतसागर दूध सहकारी संघ, दूध शीतकरण केंद्रे, धरणे, बंधारे, के. टी. वेअर, यांद्वारे शेतीसाठी पाणीपुरवठा व अगस्त्य सहकारी साखर कारखाना, रस्ते, वीज, पाणी, उद्योगधंदे, राजूर, अकोले, येथे शासकीय कार्यालयांची स्थापना ही सर्व केवळ आपल्या कठोर परिश्रमाची, चिकाटीची, अहोरात्र घेतलेल्या परिश्रमांची फलश्रुती तमाम आदिवासी समाजास प्रेरणादायी अशी आहे.

आपण समाजकारण आणि राजकारण यांची अतूट सांगड घातली. समाजकारण करताना राजकारणात तालुका, जिल्हा, राज्य व देशपातळीवर यशस्वी मजल मारली. विशेषत:, महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विभागाला स्वतंत्र स्थान, विभागासाठी स्वतंत्र निधी, आदिवासींच्या सर्वांगीण विकासासाठी नानाविध योजना या आपल्या कार्यकर्तृत्वाची, धडाडीची, कार्यकुशलतेची साक्ष देत आहेत.

आपण दुबळ्या आदिवासींना उमेदीने जगण्याचे, अस्मितेच्या जाणिवेचे स्वप्न दिले, हक्काचे भान दिले, अस्तित्वाचे प्राण दिले. खोट्या आदिवासींची घुसखोरी रोखण्यासाठी तुम्हीच संपूर्ण महाराष्ट्रातील आदिवासींना जागृत केले, विधानसभेत लढला आणि जाती प्रमाणपत्राचा कायदा मंजूर करून घेतला.

हे सर्व करताना आपण स्वत:साठी जगणे सोडून समाजासाठी जगणे, प्रसंगी प्राणपणाला लावणे पत्करले, जनतेच्या सर्वांगीण विकासाचा आपण वसा घेतला, अहोरात्र जनहितार्थ आपले आयुष्य खर्ची घातले, रयतेच्या कल्याणासाठी प्रसंगी सत्तेलाही ठोकर मारली, जनतेच्या प्रेमाच्या वैभवाची कास धरली. आपल्या कार्यकर्तृत्वाची नोंद घेऊन ऑल इंडिया दलित साहित्य अकादमी, न्यू दिल्ली, यांनी आपणांस प्रथम 'वीर बिरसा मुंडा पुरस्कार' प्रदान करून गौरव केला आहेच. तथापि, महाराष्ट्रातील आदिवासींचे द्रष्टे नेतृत्व, मार्गदर्शक, संघटक, जाणता राजा, प्रबोधनकार, तारणहार, मूर्तिमंत समाजकारणी-राजकारणी, विकासाचे शिल्पकार अशा आपणांस कर्तव्यभावनेने आदिवासी समाजाच्या वतीने, आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे, तर्फे 'आदिवासी भूषण पुरस्कार' देऊन सन्मानित करीत आहे. आपण त्याचा स्वीकार करावा, ही विनंती.

सुदाम मराडे
सचिव

सीताराम जोशी
अध्यक्ष

# आदिवासी विकासाचा द्रष्टा शिल्पकार आदिवासींची अस्मिता मा. ना. श्री. मधुकरराव पिचड

डॉ. गोविंद गारे

*अकोले तालुक्यात आदिवासी महादेव कोळी समाजाच्या उन्नतीसाठी 'आदिवासी उन्नती सेवा मंडळ' ही संस्था १९६४ सालापासून आमदार कै. यशवंतराव भांगरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत होती. या संस्थेची धुरा १९८२ सालापासून मधुकररावांनी १० वर्षे सांभाळली. त्यांच्या काळात संस्थेचा मोठा विस्तार झाला. संस्थेचा वटवृक्ष त्यांनी उभा करून वाढविला. शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. आज या संस्थेच्या अनेक आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये, छात्रालये अकोले तालुक्यात शैक्षणिक कार्य करत आहेत.*

गेल्या ५० वर्षांत आदिवासी विकासाची बरीच मोठी वाटचाल झाली आहे. अनेक छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांचे प्रयत्न त्याला कारणीभूत आहेत. आदिवासी क्षेत्रात सामाजिक कार्याची सुरुवात झाली तो काळ अतिकठीण होता. पण हळूहळू काळ बदलत गेला. नव-नवे कार्यकर्ते उदयाला आले. त्या प्रत्येकाने आदिवासींचे हित लक्षात घेऊन कार्य केले. कार्यकर्त्यांच्या मालिकेतील आदिवासी विकासाचा एक द्रष्टा शिल्पकार म्हणून नामदार मधुकरराव पिचड यांच्याकडे आदिवासी समाज आज पाहत आहे. आदिवासी समाजाचा मान, स्वाभिमान, अस्मिता त्यांनी उंचावली आहे. आदिवासी महादेव कोळी समाजाचा ते एक मानबिंदु आहेत. या समाजाला त्यांचा निश्चित अभिमान वाटावा असे त्यांचे जीवनचरित्र, सामाजिक-राजकीय कार्य आहे. त्यांची ही ओळख सर्वांना सुहृद वाटेल.

श्री. मधुकरराव पिचड यांचा जन्म मौजे राजूर, ता. अकोला येथे १९४० साली झाला. १९६२ साली ते पुण्याच्या फर्ग्युसन कॉलेजमधून बी.ए. झाले. त्यानंतर नोकरी न स्वीकारता ते समाजकार्याकडे वळले. कै. यशवंतराव भांगरे यांच्या सहवासात राहून त्यांनी सामाजिक आणि राजकीय कार्याचे धडे घेतले. त्यांच्या समवेत गावोगाव फिरून त्यांनी सहकारी दूध उत्पादन व संकलन करणाऱ्या अनेक संस्था तालुक्यात गावोगावी स्थापन केल्या. आदिवासी शेतकऱ्यांना शेतीला जोडधंदा म्हणून गाई-म्हशी पाळण्याची आवड त्यांनी लोकांमध्ये वाढविली. मधुकररावांच्या प्रेरणेतून अमृतसागर दूध सहकारी संघाची स्थापना झाली. काही वर्षे ते या संघाचे अध्यक्षही राहिले. दूध नासू नये यासाठी राजूर, अकोले, कोतूळ, ब्राह्मणवाडा अशा ठिकाणी दूध शीतकरण केंद्र त्यांनी सुरू केली. त्यांचे हे कार्य लोकांच्या कायम लक्षात राहील असे आहे. १९७२ साली ते अहमदनगर जिल्हा परिषदेवर राजूर मतदारसंघातून निवडून आले. १९८० साली आमदार कै. यशवंतराव भांगरे यांच्या अकाली निधनामुळे रिकाम्या झालेल्या जागेवर राखीव मतदारसंघातून महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आले. त्यानंतर या मतदारसंघातून सतत पुढे पाच वेळा विधानसभेवर निवडून येण्याचा मान त्यांनी मिळविला. अकोले तालुक्यात आदिवासी महादेव कोळी समाजाच्या उन्नतीसाठी 'आदिवासी उन्नती सेवा मंडळ' ही संस्था

१९६४ सालापासून आमदार कै. यशवंतराव भांगरे यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत होती. या संस्थेची धुरा १९८२ सालापासून मधुकररावांनी १० वर्षे सांभाळली. त्यांच्या काळात संस्थेचा मोठा विस्तार झाला. संस्थेचा वटवृक्ष त्यांनी उभा करून वाढविला. शिक्षणाचे दरवाजे सर्वांसाठी खुले केले. आज या संस्थेच्या अनेक आश्रमशाळा, माध्यमिक विद्यालये, छात्रालये अकोले तालुक्यात शैक्षणिक कार्य करत आहेत. आदिवासी क्षेत्रात भरीव कार्य केले म्हणून १९९२ साली संस्थेला 'आदिवासी सेवक संस्था' हा महाराष्ट्र शासनाचा बहुमानही प्राप्त झाला. मधुकररावांच्या प्रेरणेने आणि पुढाकाराने आदिवासी मुलांच्या पुढील शिक्षणाच्या दृष्टीने 'आकोले एज्युकेशन सोसायटी'ची स्थापना झाली. आज या संस्थेने आर्ट्स, सायन्स, कॉमर्स पदवीपर्यंच्या शिक्षणाची सोय असणारे महाविद्यालय चालविलेले आहे. मधुकरराव या संस्थेचे एक प्रमुख ट्रस्टी आहेत.

आदिवासी शेतकऱ्यांनी पाण्याचा व सिंचनाचा वापर करून आपली परंपरागत शेती बदलली पाहिजे. त्याशिवाय आदिवासींच्या आणि शेतकऱ्यांच्या आर्थिक जीवनात बदल होणार नाही. हा बदल घडवून आणण्यासाठी त्यांनी अखंड प्रयत्न केले. प्रवरेच्या पाण्यावर आदिवासींची शेती फुलविण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांच्या प्रयत्नांना शेतकऱ्यांनी चांगली साथ दिली. त्यातून अगस्ती सहकारी साखर कारखाना उभा राहिला. आज या कारखान्यामुळे अकोले तालुक्याचा कायापालट झालेला आहे. शिक्षणाबरोबर शेती आणि पाणी हे आदिवासी माणसाच्या परिवर्तनाचे मुख्य सूत्र त्यांनी विकसित केले आहे.

मधुकररावांनी महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री म्हणून १९८४ ते १९८६ व आदिवासी विभागाचे मंत्री म्हणून १९८६ ते ९४ पर्यंत कार्यभार सांभाळला. त्यांच्या कार्यकाळात राजूर येथे उपअभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रकल्प कार्यालय व आदिवासी विकास महामंडळाचे उपप्रादेशिक कार्यालय यांची उभारणी झाली. त्यांच्या पुढाकारातून 'मधुकरराव पिचड सहकारी पतसंस्था, राजूर' ही संस्था स्थापन झाली. आज या संस्थेचे सुमारे एक हजार सभासद असून संस्थेची कर्ज-वाटप मर्यादा १ कोटींहून अधिक झालेली आहे. मधुकरराव पिचड यांच्या मार्गदर्शनाखाली पुणे जिल्ह्यातील आदिवासी शेतकऱ्यांचा सहकारी हिरडा कारखाना जुन्नर येथे सुरू करण्याचे प्रयत्न चालू आहेत. महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेल्या महाराष्ट्रातील आदिवासी आमदारांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने मधुकररावांनी 'आदिवासी आमदार मित्रमंडळाची' स्थापना करण्यात पुढाकार घेतला. आजही हा फोरम प्रभावीपणे कार्यरत आहे. आदिवासी विकासाची धोरणे ठरविण्यासाठी या व्यासपीठाचा उपयोग करण्यात नामदार पिचड यशस्वी झाले आहेत. अखिल भारतीय आदिवासी परिषदेच्या महाराष्ट्र शाखेचे गेली ७/८ वर्षे ते अध्यक्ष आहेत. या परिषदेच्या माध्यमातून देशाच्या पातळीवर आदिवासी आमदार-खासदारांना संघटित ठेवण्याचे व संघटित करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले आहे. त्याशिवाय विशेष नोंद घेण्यासाठी महत्त्वाची बाब म्हणजे, आदिवासी महादेव कोळी समाजजागृती व हक्क संरक्षणाची चळवळ गेली ४-५ वर्षे त्यांनी ५-६ जिल्ह्यांत मोठ्या हिरिरीने चालविली. त्याचबरोबर महाराष्ट्र आदिवासी आरक्षण संरक्षण समितीचे कामही त्यांच्या नेतृत्वाखाली गेली अनेक वर्षे चालले. आदिवासी विकास विभागाचे मंत्री म्हणून त्यांनी केलेले कार्य देशात कोणत्याही राज्यात झालेले नाही एवढे प्रशंसनीय आहे. अनेक राज्यांतील कार्यकर्त्यांनी त्यांच्या कामाची वेळोवेळी पाहणी करून त्यांची वाहवा केली आहे. राज्याची आदिवासी विकासाची प्रागतिक धोरणे व त्या धोरणांची प्रामाणिक अंमलबजावणी केली तर परिवर्तनातून माणूस बदललेला, त्यांच्या जीवन-रहाटीत क्रांती झालेली दिसू लागते, असे त्यांचे प्रामाणिक मत आहे. आदिवासींच्या कार्याच्या बांधिलकीची अशी नाळ त्यांनी थेट तळागाळापर्यंत रुजविली आहे. आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना व आदिवासी क्षेत्रातील प्रशासनाचे बळकटीकरण त्यांच्या कुशल नेतृत्वाखाली झाले. आदिवासी उपयोजनेची प्रभावी कार्यवाही महाराष्ट्रभर होण्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे. १९९४ ला सत्तांतर झाल्यावरही मधुकररावांकडे विरोधी पक्षाचे नेतृत्व करण्याची संधी लाभली. पाच वर्षांच्या त्यांच्या या कार्यकाळात महाराष्ट्र

विधानसभा त्यांनी अनेकवेळा त्यांच्या प्रभावी वक्तृत्व शैलीने गाजविली. एक आदिवासी कार्यकर्त्याने महाराष्ट्र विधानसभेतील विरोधी पक्षाच्या नेतृत्वाची धुरा सांभाळली ही सत्तेच्या मंत्रिपदापेक्षा बहुमानाची बाब समजली पाहिजे. हा मान महादेव कोळी समाजातील या विद्याविभूषित कार्यकर्त्याला मिळाला. ही बाब समाजाला मोठा अभिमान वाटेल अशीच आहे. त्यांच्या अविरत प्रयत्नांपुळे व प्रभावी नेतृत्वामुळे महाराष्ट्र शासनाने नुकताच 'जाती जमाती प्रमाणपत्राचा कायदा' मंजूर केला आहे. त्याचे सारे श्रेय त्यांना आणि माननीय मुख्यमंत्र्यांना आहे. जातिप्रमाणपत्र कायद्याचा शिल्पकार म्हणून त्यांची नोंद आता समाजाला घ्यावी लगेल एवढे त्यांचे हे कार्य महत्त्वपूर्ण आहे.

आश्रमशाळांसाठी नवी संहिता आणण्याचेही त्यांचे प्रयत्न आहेत. हेही कार्य शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन घडवून आणणारे आणि आदिवासी विकासाला निश्चित दिशा देणारे ठरणार आहे. त्यांची अनेक महत्त्वाची कामे आदिवासी विकासाला दिशा देणारी, नवी कलाटणी देणारी, नवे धोरण ठरविणारी ठरली आहेत. त्यांत आदिवासी खात्याची कार्ययंत्रणा उभी करण्यापासून ते हे खाते आदिवासींच्या बदलाल आणि विकासाला गती देणारे ठरेपर्यंतची अनेक आहेत. त्यांची यादी फार मोठी होईल. उदाहरणादाखल काहींचा इथे उल्लेख करतो. आदिवासी विकास महामंडळाची स्थापना, आदिवासी आर्थिक स्थिती (सुधारणा) कायदा, १९७६, शबरी वित्तीय महामंडळ, न्यू बजेट योजनांची पुर्नरचना, आदिवासींसाठी १००% लिफ्ट योजना, खडकातील टाक्यांची पाणीपुरवठा योजना, आश्रमशाळेतून माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय. मुलींसाठी वेगळ्या आश्रमशाळा, अतिसंवेदनाक्षम प्रकल्पासाठी विशेष शासनयंत्रणा व एकात्म विकास योजना, नवसंजीवनी योजना, खोट्या आदिवासींच्या घुसखोरीला प्रतिबंध, तपासणी समित्याची पुनर्रचना; सुप्रीम कोर्टापर्यंत आदिवासींच्या हक्कांसाठी व रक्षणासाठी लढा, जि. प., नगरपालिका, महानगरपालिका यांमध्ये राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्यांच्या जातीच्या दाखल्याची तपासणी, स्वयंशासनाचा निर्णय, प्रमाणपत्र तपासणी कायदा, इत्यादींचा उल्लेख करता येईल. आदिवासी क्षेत्रांत प्रचंड धरणे झाली. आदिवासी बुडाला, उद्ध्वस्त झाला पण- कमीत कमी या धरणांच्या जलाशयांना आदिवासी स्वातंत्र्यवीरांची नावे देऊन मधुकररावांनी आदिवासी तरुणांमध्ये नवी चेतना, नवा उत्साह निर्माण करावा. समाजाच्या उन्नति बरोबरच समाजाची सामाजिक बांधणी करण्यात आता त्यांनी हात घालावा. आदिवासी समाजाची बांधणी करा ! महादेव कोळी समाजाची बांधणी करा! आणि आपल्या कार्याचा हातभार आदिवासींना लाभूद्या. याच कामातून आपण धन्य व्हा ! मधुकरराव, हाच या समाजाचा आशीर्वाद, आपण समजा.

□□

## 'आयुष्य'

*आयुष्य घेऊन यायचे आहे, जन्म घेतांना.*
*सुख-दुःख सहन करायचे आहे, जीवन जगतांना.*
*माणुसकी जोडायची आहे, जगात वावरतांना*
*बरे-वाईट ऐकायचे आहे, प्रसिद्धी मिळवतांना.*
*आठवणी भूतकाळात ठेवायच्या आहेत, वर्तमानात वावरतांना.*
*सर्वकाही इथेच ठेवायचे आहे, जगाचा निरोप घेतांना.*

# आदिवासी विकासाचा द्रष्टा शिल्पकार : मा. ना. श्री. मधुकरराव पिचड

गंगाराम सांगडे
सहायक संचालक, संयोजन कार्यालय, पुणे-११.

**महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेल्या महाराष्ट्रातील वेगवेगळ्या पक्षांतील आदिवासी आमदारांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने पिचडसाहेबांनी पुढाकार घेऊन आदिवासी आमदार मित्रमंडळाची स्थापना केली व या मित्रमंडळाच्या माध्यमातून आदिवासी आमदारांमध्ये जनजागृती, संघटन व समाजप्रबोधन करण्यामध्ये त्यांचे फार मोठे योगदान आहे. अखिल भारतीय आदिवासी परिषदेच्या महाराष्ट्र शाखेच्या माध्यमातून देशपातळीवरसुद्धा आदिवासी आमदार व खासदारांना संघटित करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या मंत्रिपदाच्या कालखंडात आदिवासी उपयोजनेची प्रभावी कार्यवाही, आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना यांमध्ये त्यांचा फार मोठा वाटा आहे.**

मागील ४० ते ५० वर्षांत आदिवासी विकासाची जी बरीच मोठी वाटचाल झाली आहे त्यामध्ये अनेक छोट्या-मोठ्या कार्यकर्त्यांचे योगदान आहे. आदिवासी समाजात सामाजिक कार्याची सुरुवात झाली तो काळ अतिशय कठीण होता. उशिरा का होईना तो काळ बदलत गेला व त्या काळात समाजातील नवे-नवे कार्यकर्ते उदयाला आले आणि महत्त्वाचे म्हणजे या प्रत्येक प्रामाणिक कार्यकर्त्याने आदिवासींचे हित लक्षात घेऊन आपआपल्या कुवतीने कार्य केले व त्यांमध्ये सामाजिक बांधिलकी, आदिवासी समाजामध्ये प्रबोधन आणि जनजागृती, संघटन, संघर्ष आणि शिक्षण या बाबींवर प्रामुख्याने या कार्यकर्त्यांचा भर होता. परंतु आदिवासींच्या रूढी, परंपरा व अंधश्रद्धा यांमधून समाजास बदलवणे त्या काळात मोठे महान काम होते. त्या कामात प्रत्येक कार्यकर्त्याने आदिवासींचे हित लक्षात घेऊन काम केले. याच कार्यकर्त्यांच्या मालिकेतील आदिवासी समाजाच्या विकासाचे शिल्पकार मा. ना. मधुकरराव पिचड हे एक आहेत आणि म्हणून आज महादेव कोळी समाजास नेहमीच त्यांचा अभिमान वाटत आहे. समाजाच्या स्वाभिमान त्यांनी उंचावला असून आज समाजाचे ते एक मानबिंदू आहेत.

अगस्ती ऋषींच्या भूमीतील मातीमध्ये रुजून आदिवासी विकासाचा ध्यास घेतलेले मा. मधुकरराव पिचड यांचा जन्म राजूर, ता. अकोला येथे १९४० साली झाला. पुण्यामध्ये बी.ए.चे शिक्षण पूर्ण करून सामाजिक व राजकीय कार्याची वाटचाल सुरू केली. महाराष्ट्र राज्याच्या आदिवासी विकास विभागाचे राज्यमंत्री म्हणून १९८४ ते ८६ व आदिवासी विकास विभागाचे मंत्री म्हणून १९८६ ते ९४ पर्यंत कार्यभार सांभाळला. १९९४ साली सत्तांतर झाल्यावरही विरोधी पक्षाचे नेतृत्व करण्याची संधी त्यांना लाभली. याच वर्षांच्या या त्यांच्या काळात महाराष्ट्र विधानसभा अनेक वेळा त्यांच्या प्रभावी वक्तृत्वाने गाजविली व आजसुद्धा महाराष्ट्र राज्याचे आदिवासी विकास व विशेष सहाय्य हे मंत्रिपद अतिशय उमेदीने व हिरिरीने सांभाळत आहेत.

आदिवासी विकासाच्या दृष्टिकोणातून दूध उत्पादन व संकलन करणाऱ्या संस्था तालुक्यात त्यांनी गावोगावी स्थापन केल्या. शेतीला जोडधंदा म्हणून आदिवासी शेतकऱ्यांना गाई, म्हशी पाळण्याची आवड त्यांनी समाजामध्ये वाढविली. राजूर, अकोले, कोतूळ, ब्राह्मणवाडा येथे दूध शीतकरण केंद्राची स्थापना, आदिवासी उन्नती सेवामंडळ या संस्थेची धुरा व विस्तार आणि या संस्थेस आदिवासी सेवक संस्था हा महाराष्ट्र शासनाचा बहुमान प्राप्त करून देणे, आदिवासी मुलांच्या शिक्षणाच्या दृष्टीने अकोले एज्युकेशन सोसायटीची स्थापना व पदवीपर्यंत शिक्षणाची सोय हे एक महान कार्य. सन १९८६ ते ९४ या काळात आदिवासी विकास विभागाचे मंत्री असताना राजूर येथे उपअभियंता कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग, प्रकल्प कार्यालय व आदिवासी विकास महामंडळाचे प्रादेशिक कार्यालय यांची उभारणी झाली. आदिवासी शेतकऱ्यांचा सहकारी साखर कारखाना म्हणून अगस्ती सहकारी साखर कारखान्याची स्थापना. याशिवाय समाजउन्नतीचा ध्यास घेणारे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात निर्माण व्हावेत यासाठी साहेब नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत.

महाराष्ट्र विधानसभेवर निवडून आलेल्या महाराष्ट्रातील वेगवेगळ्या पक्षांतील आदिवासी आमदारांना एकत्र आणण्याच्या दृष्टीने पिचडसाहेबांनी पुढाकार घेऊन आदिवासी आमदार मित्रमंडळाची स्थापना केली व या मित्रमंडळाच्या माध्यमातून आदिवासी आमदारांमध्ये जनजागृती, संघटन व समाजप्रबोधन करण्यामध्ये त्यांचे फार मोठे योगदान आहे. अखिल भारतीय आदिवासी परिषदेच्या महाराष्ट्र शाखेच्या माध्यमातून देशपातळीवरसुद्धा आदिवासी आमदार व खासदारांना संघटित करण्याचे महत्त्वाचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या मंत्रिपदाच्या कालखंडात आदिवासी उपयोजनेची प्रभावी कार्यवाही, आदिवासी विकास विभागाची पुनर्रचना यांमध्ये त्यांचा फार मोठा वाटा आहे. समाजाच्या हिताच्या व विकासाच्या दृष्टिकोणातून आदिवासी आमदार व खासदारांना संघटित करून आदिवासी कार्यकर्त्यांना, समाजसेवकांना संघटित करून आदिवासी समाजामध्ये होणारी घुसखोरी थांबविण्याच्या दृष्टीने शासनाकडे प्रभावी अंमलबजावणीसाठी मागणी करणे व पाठपुरावा करणे या त्यांच्या अविरत प्रयत्नांमुळे व प्रभारी नेतृत्वामुळे महाराष्ट्र शासनाने नुकताच जाती प्रमाणपत्राचा कायदा मंजूर केला आहे. या कायद्याचा शिल्पकार म्हणून माननीय मधुकरराव पिचड यांच्याकडे सर्व श्रेय जाते.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर, आंबेगाव, खेड व मावळ तसेच पुणे शहरामध्ये राहणाऱ्या शेतकरी, व्यावसायिक, नोकरदार आदिवासी बांधवांसाठी व त्यांचे हक्क त्यांना मिळवून देण्यासाठी साहेबांनी वैयक्तिक तसेच सामूहिक मदत व मार्गदर्शन जरी ते मंत्रिपदावर असले तरी सामाजिक कर्तव्याच्या भावनेतून त्यांनी केलेले आहे. आदिवासी समाजाचा मान, स्वाभिमान, आत्मसन्मान वाढविण्यासाठी आदिवासी भागातील धरणांच्या जलाशयाला आदिवासी स्वातंत्र्यवीरांची व कार्यकर्त्यांची नावे देणे शिवाय आदिवासी जनतेच्या आर्थिक विकासासाठी आदिवासी भागधारकांची सहकारी बँक स्थापन करणे, आदिवासी हाऊसिंग सोसायट्यांना सरकारी जागा मिळाव्यात म्हणून प्रयत्न करणे, जुन्नरमधील श्री कुकडेश्वर आदिवासी हिरडा औद्योगिक उत्पादन सहकारी संस्थेला अर्थसहाय्य, पुण्यामधील त्रिमूर्ती आदिवासी सहकारी गृहनिर्माण संस्थेस सरकारी जागा मिळवून देण्याबाबत प्रयत्न, तसेच, पुणे शहर आदिवासी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, पुणे, आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे, या संस्था स्थापन करण्यात व त्यांना मार्गदर्शन व मदत करण्यात नामदार पिचड यांचे मोलाचे सहकार्य लाभले असून आदिवासी महासंघ, महाराष्ट्र, पुणे या संघटनेस तसेच आदिवासी महादेव कोळी कर्मचारी संघटनेससुद्धा त्यांचे आशीर्वाद व सहकार्य नेहमीच राहिलेले आहे.

आदिवासी समाजातील व्यक्तींच्या सुखदुःखांत तसेच सामाजिक समारंभांमध्ये सामाजिक बांधिलकी म्हणून मा. पिचड यांनी आवर्जून उपस्थिती ठेवून समाजामध्ये जुन्या कार्यकर्त्यांबरोबर नेहमीच वैचारिक बैठक ठेवून आणि जुन्या कार्यकर्त्यांना एकत्र घेऊन मंत्रिपदाची धुरा

सांभाळत आहेत. बदलत्या राजकीय समीकरणांबरोबर नवीन आव्हाने स्वीकारण्यासाठी समाजातील नवीन कार्यकर्ते तयार होण्यामध्येसुद्धा ते नेहमीच प्रयत्नशील राहिले आहेत व याचे अलीकडील ताजे उदाहरण म्हणजे, पुणे जिल्हा परिषदेवर अध्यक्ष म्हणून मा. श्री. देवरामजी लांडे यांची झालेली निवड ही होय. सर्व समाज असाच एकोप्याने राहिला तर बरेच काही करता येईल व नवीन आव्हाने स्वीकारत आदिवासींनी विचारांची लढाई लढावी असे नेहमी वेगवेगळ्या कार्यक्रमांत व व्यासपीठांवरून बोलताना सांगत असतात.

आदिवासी समाज कृती समिती, महाराष्ट्र, पुणे, यांच्यातर्फे आदिवासी भूषण पुरस्कार दिनांक २५ ऑगस्ट २००२ रोजी पुणे येथे समारंभपूर्वक मा. पिचडसाहेब यांना प्रदान करण्यात येत आहे. समाजाच्या उन्नतीबरोबरच समाजाची सामाजिक बांधणी करण्यात आता त्यांनी हात घालावा आणि १०० वर्षे आपल्या कार्याचा हातभार आदिवासींना लाभू द्या. याच कामातून आपण धन्य व्हा ! साहेब, हाच या समाजाचा आशीर्वाद आपण समजा.

□□

## भूमाता

भूमातेत जन्म घेतला यौवनात पदार्पण केले
म्हणून तुझी आठवण झाली.

बाल्यावस्था समाप्त झाली, भूमि अभिलेखाशी
नाते जोडले म्हणून तुझी आठवण झाली,

सेवानिवृत्तीही जवळ आली असे वाटते
वार्धक्य आले म्हणून तुझी आठवण झाली.
भूमातेची आठवण झाली .....

– इंद्रसेन लांडे